आटोपला. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४८९ तर दुसऱ्या डावात २६० धावा केल्या होत्या. भारताचा संघ पहिल्या डावात २०१ तर दुसऱ्या डावात १४० धावा करून तंबुत परतला. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेनं हा सामना ४०८ धावांनी जिंकला. दुसऱ्या डावात भारताकडून रविंद्र जडेजाने सर्वाधिक ५४ धावा केल्या. उर्वरित बहुतांश फलंदाज २० धावांचा आकडाही गाठू शकले नाहीत.

या पराभवानंतर कसोटी क्रिकेट क्रमवारीत भारताची घसरण झाली असून तो आता पाचव्या स्थानावर आहे. या क्रमवारीत ऑस्ट्रेलिया पहिल्या क्रमांकावर, दक्षिण आफ्रिका दुसऱ्या, न्यूझीलंड तिसऱ्या तर पाकिस्तान चौथ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर जावोखीर सिंदारोव्ह यानं फिडे विश्वचषक स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं आहे. अवघ्या १९व्या वर्षी ही कामगिरी करणारा तो सर्वात कमी वयाचा बुद्धिबळपटू ठरला आहे. गोव्यातल्या अरपोरा इथं झालेल्या या स्पर्धेत त्यानं चीनचा ग्रँडमास्टर वेई यी याला हरवलं. सिंदारोव्ह, वेई यी आणि रशियाचा आंद्रे एसिपेंको हे तिघेही पुढच्या वर्षी होणाऱ्या कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरले आहेत. या स्पर्धेत विजयी होणारा बुद्धिबळपटू विद्यमान विश्वविजेता, ग्रँडमास्टर डी. गुकेश याला आव्हान देईल.

**//<><><><><>//**